प्रकरण पाचवे

निष्कर्ष आणि सूचना

प्रकरण पाचवे

निष्कर्ष आणि सूचना

राशिवडे येथील धनगर स्त्रिया : त्यांच्या व्यावसायिक भूमिका आणि जीवन हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.

प्रस्तुत प्रकरणातील निष्कर्ष हे राशिवडे येथील निवडलेल्या नमुन्यातील १00 महिला उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे मांडलेले आहेत.

संकलित केलेल्या माहितीच्या आधारे धनगर स्त्रियांच्या व्यावसायिक भूमिका आणि जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये तीन स्थूल विभाग करण्यात आले आहेत.

I) उत्तरदात्या स्त्रियांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी

II) उत्तरदात्या स्त्रियांचे कामाचे स्वरूप

III) उत्तरदात्या स्त्रियांच्या कामाचा त्यांच्या जीवनावर होणार परिणाम

प्रस्तुत संशोधनातील प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

I) उत्तरदात्या स्त्रियांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी :

उत्तरदात्या स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीविषयीच्या माहितीवरून असे दिसून येते की लोकर कातणाऱ्या स्त्रियामध्ये ३१ ते ४५ या वयोगटातील उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात अधिक (३५%) आहे. तर ४६ ते ५५ या वयोगटातील उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी (१३%) आहे. २0 ते २५ वयोगटातील ३१% तर २६ ते ३0 वयोगटातील उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २१% इतके आहे. तरूण आणि वृद्ध स्त्रियांच्या तूलनेत प्रौढ वयोगटातील उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक आहे असे दिसून येते.

शैक्षणिक पात्रतेचा विचार करता बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया या अशिक्षित आहेत (७२%), प्रामिक शिक्षण घेतलेल्या २२ % इतक्या आहेत. तर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्या स्त्रिया अनुक्रमे ५% आणि १% आहेत. उत्तरदात्या स्त्रियामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे असे दिसून येते.

बहुसंख्य उत्तरदात्या स्त्रिया (५६ %) या संयुक्त कुटुंबातील आहेत तर उर्वरीत उत्तरदात्या स्त्रिया (४४%) या विभक्त कुटुंबातील आहेत. उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंब प्रकारात संयुक्त कुटुंबाची पार्श्वभूमी असणाऱ्या स्त्रिया संख्येने सर्वाधिक आहेत, असे सूचित होते.

कुटुंबाच्या आकारमानानुसारच्या माहितीतील सर्वाधिक उत्तरदाते आकाराने मध्यम (६ ते १० सदस्यसंख्या) असणाऱ्या कुटुंबातील (५२%) आहेत. त्याखालोखाल आकाराने लहान (१ ते ५ सदस्य संख्या) असणाऱ्या कुटुंबातील (४५%) आहेत तर केवळ ३% उत्तरदात्या स्त्रिया आकाराने मोठ्या (११ हून अधिक) असणाऱ्या कुटुंबातील आहेत. सर्व साधारणपणे उत्तरदात्या स्त्रियामध्ये संयुक्त कुटुंबाची पार्श्वभूमी लाभलेले उत्तरदाते अधिक प्रमाणात असल्याने मध्यम आकाराच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे.

बहुसंख्य उत्तरदात्या स्त्रियांचे पती निरक्षर (७३%) आहेत. तर अत्यल्प उत्तरदात्या स्त्रियांचे पती साक्षर (२१%) आहेत.

सर्वाधिक उत्तरदात्या स्त्रियांच्या पतीचा व्यवसाय (८५%) शेळ्यामेंढ्या पालन हा असून इतर नोकरी किंवा इतर काम करणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण नगण्य (९%) आहे. यावरून असे सूचित होते की उत्तरदात्त्या पतींच्या पारंपरिक व्यवसायातील बदलाचे प्रमाण अत्यल्प आहे.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांचे घर कच्च्या स्वरूपाचे आहे (६६%), तर पक्क्या घरामध्ये राहणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण कमी (३४%) आहे. पूर्वीपासून रहात असलेल्या कच्च्या घराचे स्वरूप आजतागायत तसेच आहे.

धनगर उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबावर बिरदेव या देवाचा प्रचंड पगडा आहे. त्यांच्यामुळे आजारपणात देवऋषीकडे जाणे, दैवाला कौल लावणे यावर विश्वास होता. पण सद्यपरिस्थितीत यामध्ये बदल होऊन प्राथमिक आरोग्यकेंद्रात जाण्याचे प्रमाण वाढत आहे. ही उल्लेखनीय बाब आहे.

जमीन मालकी क्षेत्रानुसार उत्तरदात्या स्त्रियांचे वर्गीकरण केले असता बहुसंख्य उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबाकडे (८१ %) स्वत:च्या मालकीची जमीन नाही. तर उर्वरीत उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबाकडे स्वत:च्या मालकीची जमिन आहे असे दिसून आले. या जमिनीमध्ये जिरायत प्रकारच्या जमिनीचे प्रमाण अधिक आहे.

उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न पाहिले तर बहुसंख्य उत्तरदात्या स्त्रियांचे (३९ %) वार्षिक उत्पन्न रू १0,000 ते रू. १५,000 या गटातील आहे. तर रू. २५,00१ हून अधिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण कमी (१७ %) इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे रू. १५,00१ ते रू. २0,000 आणि रू. २0,00१ ते रू. २५,000 वार्षिक उत्पन्न असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे १२% आणि ३२% इतके आहे.

५६% उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबानी कर्ज घेतलेले नाही. तर ४४% उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबानी कर्ज घेतलेले आहे.

धनगर स्त्रियांची आर्थिक, सामाजिक पार्श्वभूमी स्वतंत्रपणे अभ्यासली आहे. वयोगट, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी आणि कौटुंबिक उत्पन्न या निवडक परिवर्त्यासंदर्भातील माहितीचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले असता त्यावरून असे दिसून येते की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया, अशिक्षित, पौढ गटातील, संयुक्त कुटुंबातील आकाराने मध्यम असणाऱ्या कुटुंबातील आहेत. असे प्रत्यक्ष निरीक्षणावरून दिसून आले.

II) उत्तरदात्या स्त्रियांचे कामाचे स्वरूप :

बहुतांशी उत्तरदात्यांनी (७४%) आर्थिक कारणासाठी हा व्यवसाय स्विकारलेला आहे. स्वावलंबन (१५%) आणि परंपरेनुसार (११%) व्यवसाय स्विकारणाऱ्या उत्तरदात्या स्त्रिया नगण्य आहेत.

कौटुंबिक मालकीच्या मेंढ्याच्या संख्येनुसार सर्वाधिक उत्तरदात्या स्त्रियांच्या (६८) कौटुंबिक मालकीच्या मेंढ्या २६ ते ५0 आहेत. तर त्याखालोखाल १६ उत्तरदात्या स्त्रियांच्या मेंढ्या ५१ ते ७५ आहेत. १४ उत्तरदात्या स्त्रियांच्या ७५ पेक्षा जास्त आहेत तर २ उत्तरदात्या स्त्रियांच्या मेंढ्या १0 ते २५ आहेत.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया (८४) आपल्या व्यवसायासाठी स्वत:च्या मेंढ्यांची लोकर संपल्यावर विकत आणतात तर काही (१६) उत्तरदात्या स्त्रिया लोकर स्वत:च्या मेंढ्यांची वापरतात.

कामाची निश्चित वेळ सांगता येत नाही अशा उत्तरदात्या स्त्रिया ३७ % तर त्या खालोखाल २ ते ८ ही वेळ असणाऱ्या उत्तरदात्या ३६%, ११ ते ५ ही वेळ असणाऱ्या उत्तरदात्या २७% आहेत. पतीचा शेळयामेंढ्या व्यवसाय असल्याने मुलांचे संगोपन, कौटुंबिक जबाबदारी किंवा इतर कामे यामुळे तसेच कुटुंबातर्गत व्यवसायामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्या कामाच्या वेळा वेगवेगळ्या आहेत हे स्पष्ट होते.

सर्वाधिक (८५%) उत्तरदात्या स्त्रियांना या कामासाठी वेगळी खोली नाही. तर वेगळी खोली असणाऱ्या स्त्रिया कमी (१५%) आहेत.

एका महिन्यामध्ये उत्तरदात्या स्त्रिया जी लोकर काततात, त्यापासून ५ ते ६ घोंगडी बनणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक (५८%) आहे. त्या खालोखाल ३ ते ४ घोंगडी बनणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २८ % तर ७ ते ८ घोंगडी बनणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी (१२%) आहे.

या व्यवसायातील मिळणारे मासिक उत्पन्न पाहिले तर ५८% उत्तरदात्या स्त्रियांचे मासिक उत्पन्न रू. ६0१ ते रू ८00 आहे. २८% उत्तरदात्या स्त्रियांचे मासिक उत्पन्न रू. ३00 ते रू.६00 आहे. तर रू. ८0१ ते रू. १000 पर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी (१४%) इतके आहे.

या कामामध्ये लागणारा कच्चा माल, घोंगडी बनवण्यापूर्वीपर्यंतची कामाची प्रक्रिया, या कामासाठी लागणारा वेळ, या घोंगड्याना येणारा भाव इ. घटकामुळे बहुतांशी

(६७%) उत्तरदात्या स्त्रियांना आपल्या कामामध्ये काही प्रमाणात समाधान वाटते, तर कामामध्ये समाधान वाटत नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्या स्त्रिया सर्वात कमी (९ %) आहेत. कामामध्ये समाधान वाटते अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २४% इतके आहे.

कौटुंबिक चरितार्थ अधिक चांगल्या पद्धतीने चालण्यासाठी या व्यवसायाला जोडकाम म्हणून उत्तरदात्या स्त्रिया इतरांच्या शेतामध्ये मजूरी करतात असे मुलाखतीतून सूचित झाले.

III) उत्तरदात्या स्त्रियांच्या कामाचा त्यांच्या जीवनावर होणार परिणाम :

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना (७४%) व्यावसायिक समस्या जाणवतात तर अत्यल्प उत्तरदात्या स्त्रियांना (२६%) व्यावसायिक समस्या जाणवत नाहीत. लोकर दुरून आणावी लागते, लोकर पिंजण्याचे मशीन नाही, घोंगड्यांना दर जास्त येत नाही, जागेची अडचण या वेगवेवळ्या प्रकारच्या समस्या उत्तरदात्या स्त्रियांना आहेत.

या कामामुळे सर्वच उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर हातदुखी, पाठीचा त्रास, मानेचा त्रास, डोळ्याचा त्रास या स्वरूपामध्ये परिणाम झालेला आहे. असे प्रत्यक्ष निरीक्षणावरून दिसून आले.

उत्तरदात्या स्त्रियांच्या कामाची आखणी ज्या पद्धतीने होते त्यामध्ये मुख्यत: त्यांची व्यावसायिक कामाची वेळ, कौटुंबिक जबाबदाऱ्या यातून त्यांना वेळ मिळत नाही. तसेच मूळत: किंवा परंपरेनुसार पिढ्यानपिढ्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने बहुसंख्य उत्तरदात्या स्त्रिया अशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांचे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

व्यवसायामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्या घरकामावर परिणाम झालेला दिसून येतो. त्यांच्यावर कामाचा ताण पडतो. संयुक्त कुटुंबपद्धतीमधील बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना घरकामात वेळ देता येतो तर विभक्त कुटुंबपद्धतीमधील बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांची घरकामात ओढाताण होते.

कौटुंबिक स्वास्थ्य लाभणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ५२% आहे तर ४८% उत्तरदात्या स्त्रियांना कौटुंबिक स्वास्थ्य मिळत नाही. उत्तरदात्या स्त्रियांचे जीवन कामाने व्यापलेले आहे. त्यांचा पूर्ण वेळ कामात जातो. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून व्यावसायिक भूमिका पार पाडावी लागते. याचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक स्वास्थ्यावर होतो.

व्यावसायिक भूमिका आणि त्यांचे नित्य जीवन यामध्ये या गुरफटलेल्या आहेत. जुन्या रूढी परंपराच्या प्रभावामुळे त्यांच्या मनोवृत्तीत बदल झालेला नाही. पारंपरिक जीवन आणि चौकटबद्ध विचारसरणी यामुळे त्यांच्यामध्ये धाडस निर्माण झालेले नाही. त्यामुळे बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया (९८%) गावामध्ये होणाऱ्या कार्यक्रमात किंवा समारंभात सहभागी होत नाहीत.

उत्तरदात्या स्त्रियांनी स्थानिक पातळीवरच्या ग्रामपंचायत तसेच पंचायत समितीच्या निवडणूका लढवल्या आहेत का ? यासंबंधी माहिती मिळवली असता असे दिसून आले की एकही उत्तरदात्री स्त्रीने अशा निवडणूका लढवलेल्या नाहीत. यावरून स्पष्ट होते की उत्तरदात्या स्त्रिया या बाह्य क्षेत्रापासून अलिप्त आहेत.

मिळणाऱ्या पैशातून बचत करणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ३४% आहे तर ६६% उत्तदात्या स्त्रिया मिळणाऱ्या पैशातून बचत करत नाही. कौटुंबिक ओढाताणीमुळे गुंतवणूक करण्याइतपत पैसे शिल्लक रहात नाहीत असे दिसून आले.

बहुतांशी स्त्रिया (६५%) आपल्या मिळकतीचा वापर कौटुंबिक कारणासाठी करतात. कामातून मिळणाऱ्या मिळकतीचा वापर फार थोड्या स्त्रिया (३५%) स्वत:च्या व्यक्तीगत गरजांच्या पूर्ततेसाठी उदा. स्वत:साठी कपडेलत्ता किंवा एखादा दागिना यासाठी करतात असे दिसून येते.

महिला मंडळामध्ये उत्तरदात्त्या स्त्रियांचा सहभाग कितपत आहे याविषयी माहिती मिळवली असता असे दिसून आले की एकही उत्तरदाती स्त्री महिला मंडळामध्ये सहभागी नाही. त्यांच्या व्यावसायिक भूमिका आणि त्यांचे नित्य जीवन एवढेच मर्यादीत जीवन असून इतर गोष्टीपासून त्या अलिप्त आहेत असे म्हणता येईल.

६७% उत्तरदात्या स्त्रियांच्या व्यवसायातून काही प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात. २७% उत्तरदात्या स्त्रियांच्या बऱ्या प्रमाणात तर ६% उत्तरदात्या स्त्रियांच्या आवश्यक गरजा भागत नाहीत असे उत्तरदात्या स्त्रियांनी सांगितले.

कमावती स्त्री म्हणून तुमच्या कुटुंबामध्ये आदर मिळतो का? असा प्रश्न विचारला असता नमुन्यातील सर्वच उत्तरदात्या स्त्रियांनी स्वत:ला आपल्या कुटुंबात आदर मिळतो असे सांगितले ही उल्लेखनीय बाब आहे.

उत्तरदात्या स्त्रियांना कुटुंबामध्ये स्वत:चे मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे का? याबद्दल मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की ५0% उत्तरदात्या स्त्रिया कधी कधी स्वत:चे मत मांडतात. ३७% उत्तरदात्या स्त्रियांना नेहमी मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. तर उर्वरीत १३% उत्तरदात्या स्त्रियांना कधीच मत मांडण्याचे स्वातंत्र्य नाही. पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव इथे दिसून येतो.

व्यावसायिक कामामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्यात बदल झाले आहेत का? याविषयी असे दिसून आले की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना कुटुंबाला हातभार लावण्याचा आत्मविश्वास निर्माण झाल आहे असे वाटते.

या व्यवसायामुळे समाजातील कुटुंबाचा आणि तुमचा दर्जा सुधारला आहे का? असे आपणास वाटते का? असा प्रश्न विचारला असता सर्वच उत्तरदात्या स्त्रियांनी नाही असे सांगितले. पारंपरिक व्यवसाय, उत्पन्न जास्त मिळत नाही, शैक्षणिकदृष्ट्या मागास, जून्या रूढी परंपराचा प्रभाव इ.कारणामुळे समाजातील दर्जा सुधारलेला नाही असे मिळालेल्या माहितीवरून सूचित होते.

या कामामुळे त्यांना जी मिळकत होते. त्यातून बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या (९४) कुटुंबामध्ये बदल झालेला आहे. तर उर्वरीत उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबात बदल झालेला नाही असे दिसून येते.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया (६७%) या कुटुंबातील प्राथमिक गरजा जसे घरखर्च, बाजारहाट या गोष्टी प्रामुख्याने स्वत: मिळणाऱ्या पैशातून भागवतात. जर १३%

उत्तरदात्या स्त्रियांच्या मुलांचे कपडेलत्ते, औषधे इतर आवश्यक वस्तू भागण्यास मदत होते. मुल शिकताना आपल्या मिळकतीमधील पैसे देणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ९% असून ही उल्लेखनीय बाब आहे. तर ५% उत्तरदात्या स्त्रिया या करमणूकीच साधन घेऊ पाहतात. यावरून असे दिसून येते की उत्तरदात्या स्त्रियांनी त्यांच्या कुटुंबाला हातभार लावलेला आहे.

एकंदरीत वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की उत्तरदात्या स्त्रिया आपल्या कामातून कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागवण्याचा प्रयत्न करत आलेल्या आहेत.

मुलाखत पत्रिकेच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषणावरून प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष तीन विभागात मांडलेले आहेत. यावरून उत्तरदात्या स्त्रिया त्यांच्या व्यावसायिक भूमिका कशा पद्धतीने पार पाडतात आणि त्यांचा उत्तरदात्या स्त्रियांया जीवनावर कशा पद्धतीने परिणाम होतो हे स्पष्ट होते.

स्त्रियांसंदर्भात संशोधिकेची निरीक्षणे :

धनगर उत्तरदात्या स्त्रियांचे जीवन हे कामाने व्यापलेले आहे. त्यांच्या पतीचा शेळ्यामेंढ्या पालन हा प्रमुख व्यवसाय असल्याने त्यांना वर्षातील ८ ते ९ महिने भटकंती करावी लागते. या कारणास्तव मुलांचे संगोपन आणि एकंदरीत कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर पडलेली असते. त्याबरोबरच त्या व्यावसायिक भूमिका किंवा काम जोमाने पार पाडत असतात. पारंपरिक जीवनपद्धतीनुसार त्यांचे राहणीमान आहे. त्यामध्ये फारसा बदल झालेला नाही. काम आणि त्यांचे नित्य जीवन यामध्ये त्या इतक्या गुंतलेल्या आहेत की आधुनिक जीवनपद्धतीचा किंवा होत जाणऱ्या बदलांचा त्यांच्यावर प्रभाव पडत नाही. परंपरेनुसार किंवा पिढ्यानपिढ्या पारंपरिक जीवन पद्धत जगण्याची त्यांना सवय लागलेली आहे. धर्माबाबतचा विश्वास त्यांच्या मनात खोलवर रूजला आहे. त्यामुळे त्यांच्या विचारसरणीत किंवा त्यांच्या मनोवृत्तीत परिवर्तन घडून येत नाही. जीवनामध्ये येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याची त्यांची वृत्ती आहे.

त्यांच्या व्यावसायिक भूमिकामूळे त्यांच्या मुलांचे शिक्षण, घरकाम, कौटुंबिक स्वास्थ्य इ.वर परिणाम होतोच.त्यांची जी मिळकत होते त्यातून घरखर्च किंवा कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागवण्याचा त्या प्रयत्न करत असतात. आपल्या कुटुंबाला हातभार लावण्याचा प्रयत्न करत असतात.

परंपरेने किंवा पिढ्यानपिढ्या धनगर स्त्री-पुरूष आपल्या व्यवसायाशी बांधलेली आहे. त्यांची ही जीवन पद्धत किंवा विचारसरणी तशीच ती पुढे पुढे हस्तांतरीत होत गेलेली आहे. पिढ्यानपिढ्या ही परिस्थिती अशीच आहे. त्याच्यामुळे त्यांचे चाकोरीबद्ध जीवन झालेले आहे. म्हणून आपला व्यवसाय आणि जीवन यामध्ये त्या समाधान मानतात. त्यामुळे गावामध्ये एखादा कार्यक्रम, समारंभ असेल तर त्या सहभागी होण्यासाठी नापसंती दर्शवतात. कारण समाजात वावरण्याचे धाडस त्यांच्यामध्ये अजून निर्माण झालेला नाही.

कुटुंबासंदर्भात संशोधिकेची निरीक्षणे :

धनगर कुटुंबाचे राहणीमान साध्या प्रकारचे आहे. त्यामध्ये हळूहळू परिवर्तन होत आहे. धनगर कुटुंबांमध्ये धार्मिक जीवनाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या मनावर धर्माचा पगडा इतका बसलेला आहे की त्यांच्या जीवनात जे काही चांगले, वाईट घडत अस्ते त्याला कारणीभूत देव आहे, असे ते मानतात रूढी परंपरांचा प्रभाव धनगर कुटुंबावर दिसून येतो. अजूनदेखील धनगर कुटुंबामध्ये मुलींचे विवाह हे लवकर केले जातात. धनगर कुटुंबामध्ये कुटुंबनियोजनाचा अभाव दिसून येतो.

बहुतांशी प्रमाणात पारंपरिक वेशभूषा आहे. त्यामध्ये बदल हा हळूहळू होत आहे. शेळ्यामेंढ्या पालन हा व्यवसाय भटकंतीच्या स्वरूपात असल्याने धनगर कुटुंबामध्ये शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या मनामध्ये म्हणावी तेवढी आस्था निर्माण झालेली नाही. सध्या शैक्षणिक जागृती निर्माण होत आहे. धनगर कुटुंबामध्ये पुरूषांचा शेळ्यामेंढ्या पालन हा व्यवसाय केला जात आहे. इतर व्यवसाय किंवा नोकरी करण्याकडे बदल होत आहे पण कल

कमी आहे. तर स्त्रिया मेंढ्यापासून मिळणाऱ्या लोकरीपासून सूत तयार करतात. शेतमजूरीही करतात.

पारंपरिक व्यवसाय आणि त्याला अनुसरून त्याची जीवनपद्धती असे धनगर समाजाचे चित्र दिसून आले. एकंदरीत त्यांच्या पारंपरिक जीवन जगण्यातून त्यांची आगळीवेगळी संस्कृती दिसून येते.

सूचना :

१. धनगर स्त्रियांमध्ये सर्व बाबतीत जागृती निर्माण होण्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान किंवा चर्चासत्रे आयोजित केली पाहिजे.

२. धनगर स्त्रियांची मानसिक जडणघडण नव्याने करण्याची आवश्यकता आहे.

३. स्त्रियांच्या पारंपरिक व्यावसायिक कौशल्य व क्षमता यांचा विकास करणे आवश्यक आहे.

४. परंपरागत व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य करणे.

५. यांत्रिक पद्धतीने लोकर कातरणी केली पाहिजे.

लोकर कातरणी ही देशी कात्रीने केली जाते. कात्रीने लोकर कातरताना कात्रीचे पान लोकरीच्या मूळापर्यत म्हणजे त्वचेपर्यंत जाऊ शकत नसल्यामुळे लोकरीच्या धाग्याचा तुकडा पडतो, यांत्रिक पद्धतीने लोकर कातरणी केल्यामुळे लोकरीच्या धाग्याचा तुकडा न पडता अखंड धागा मिळाल्याने लोकरीची प्रतवारी चांगली मिळून वजनातही वाढ होऊन लोकर अधिक मिळते.